सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय ,बीड,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)**

**E-Mail- rdc.beed2@gmail.com**
दुरध्वनी क्र.0242-222604

वाचा : १. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र.करोना-2020/प्र.क्र.58/आरोग्य-5, दि.13, मार्च 2020.
2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र.करोना-2020/प्र.क्र.58/आरोग्य-5, दि.14, मार्च 2020.

**मशाका/आपत्ती व्यवस्थापन/कावी**
**जिल्हाधिकारी कार्यालय, बीड**
**क्र.कक्ष/कोरोना विषाणू/2020**
**बीड दिनांक:-19/03/2020**

**आदेश**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र.1 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र.3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्‌भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थाचे सेवन करुन सार्वजनिक ठिकाणी थुंकणे व धुम्रपान करणे यामुळे करोना विषाणू (COVID-19) चा प्रसार व प्रादुर्भाव होऊ शकतो. त्यामुळे असे पदार्थ विक्री करणारी दुकाने व पानटपऱ्या बंद करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी राहुल रेखावार, जिल्हाधिकारी बीड उपरोक्त वाचा क्र.2 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार करोना विषाणूचा (COVID-19) होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून बीड जिल्ह्यामध्ये तंबाखु व तंबाखुजन्य धुम्रपानाचे पदार्थ इ. ची विक्री करणारी सर्व दुकाने/ पान टपऱ्या इ. दि.31 मार्च, 2020 पर्यंत बंद ठेवण्यात यावीत असे आदेशीत करीत आहे.

या आदेशानुसार सर्व मुख्याधिकारी न.पा./न.पं. व सर्व ग्रामसेवक यांनी तात्काळ कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीची दैनंदिन माहिती/ अहवाल सादर करण्याची दक्षता घ्यावी. यावर नियंत्रण अधिकारी म्हणुन उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा.पं. जि.प., बीड, पोलीस उपअधीक्षक (गृह), सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, बीड यांची नेमणुक करण्यात येत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना उपरोक्त वाचा क्र.2 मधील "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदीनुसार दंडनिय/ कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

19/03/20

**(राहुल रेखावार, I.A.S)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,बीड**

**प्रती** -1.सर्व विभाग प्रमुख ------------------------------------------------------------ जिल्हा बीड

**प्रत** - 1.मा. विभागीयआयुक्त, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांचे कडेस माहितीस्तव सविनय सादर.
2.मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई३२यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
3.जिल्हा माहिती अधिकारी,माहिती कार्यालय बीड यांनी वरीलप्रमाणे तात्काळ प्रेस नोट प्रसिद्ध करावी.